# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

पत्ता : ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारिस रस्ता, मानपाडा, ठाणे (प.) -४००६१०

Email : adminoffmmr@sra.gov.in website : http://srammr.maharashtra.gov.in दूरध्वनी : ०२२-४१३५६८४०


जा.क्र. झोपुप्रा/प्रशासन/जाहीरात/246/२०२५ दि. 10/06/2025

## कंत्राटी पदांच्या मुलाखतीसाठी जाहीरात

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे या कार्यालयामध्ये शासकीय/ निमशासकीय/ शासन अंगीकृत उपक्रमांमधून किंवा खाजगी क्षेत्रातील समतूल्य / तत्सम पदाचा अनुभव असलेल्या उमेदवारामधून मुलाखतीद्वारे / परीक्षेद्वारे "विविक्षीत कामासाठी" कंत्राटी तत्त्वावर ११ महिन्यांकरिता खालील पदे भरणेबाबत जाहीरात.

| अ.क्र. | पदाचे नाव, शैक्षणिक अर्हता, अनुभव, मानधन | एकूण पदे |
|---|---|---|
| १ | **पदाचे नाव** : मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (Chief IT Officer)<br><br>**शैक्षणिक अर्हता (किमान):** बी.ई./आय.टी., बी.टेक./कम्प्युटर सायन्स, एमसीए अथवा सम कक्ष अर्हता<br><br>**कामाचा अनुभव** : शासकीय/ निमशासकीय / खाजगी कार्यालयामध्ये मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (Chief IT Officer) किंवा माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (IT Officer) किंवा सिनीअर प्रोगामर/आय.टी.किंवा मॅनेजर /आय.टी. किंवा तत्सम पदावर किमान ७ वर्षे काम केल्याचा अनुभव.<br>शासकीय कार्यालयातील कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br><br>**परिश्रमिक : रु. ६७,७००/- + वाहतूक भत्ता(रु.६,०००/- पर्यंत)**<br><br>**कामाचे स्वरुप :-**<br>१) या कार्यालयातील आय.टी. ॲप्लीकेशन्सचे संपूर्ण नियंत्रण आणि अंमलबजावणी, हार्डवेअरच्या माध्यमातून माहितीचे संरक्षण, नेटवर्क आणि वापरकर्ता सुरक्षा तसेच सॉफ्टवेअर संबंधीत कामे, सी.सी.टी.व्ही. इत्यादी.<br>२) कार्यालयाच्या ई-प्रणालीबाबत सल्ला देणे, माहिती तंत्रज्ञानविषयक योजना/धोरण, आय.टी. संसाधने, नेटवर्किंग, आवश्यकतेनुसार संसाधने व सुटे भाग यांची खरेदी आणि देखभालीच्या अनुषंगाने तांत्रिक सल्ला देणे.<br>३) या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार माहिती तंत्रज्ञान विषयक इतर कामे व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळोवेळी सोपविलेली कामे. | १ |
| २ | **पदाचे नाव** : माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (IT Officer)<br><br>**शैक्षणिक अर्हता (किमान):** बी.ई./आय.टी., बी.टेक./कम्प्युटर सायन्स, बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स/आय.टी.) अथवा सम कक्ष अर्हता<br><br>**कामाचा अनुभव** : शासकीय/ निमशासकीय / खाजगी कार्यालयामध्ये माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (IT Officer) किंवा सहायक माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (Assistant IT Officer) किंवा | २ |

| | | |
|---|---|---|
| | प्रोग्रामर/आय.टी.किंवा मॅनेजर /आय.टी. किंवा तत्सम पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव.<br>शासकीय कार्यालयातील कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br><br>**परिश्रमिक : रु. ५६,१००/- + वाहतूक भत्ता(रु.५,०००/- पर्यंत)**<br><br>**<u>कामाचे स्वरुप :-</u>**<br>१) या कार्यालयातील आय.टी. ॲप्लीकेशन्सचे संपूर्ण नियंत्रण आणि अंमलबजावणी, हार्डवेअरच्या माध्यमातून माहितीचे संरक्षण, नेटवर्क आणि वापरकर्ता सुरक्षा तसेच सॉफ्टवेअर संबंधीत कामे, सी.सी.टी.व्ही. इत्यादी.<br>२) कार्यालयाच्या ई-प्रणालीबाबत सल्ला देणे, माहिती तंत्रज्ञानविषयक योजना/धोरण, आय.टी. संसाधने, नेटवर्किंग, आवश्यकतेनुसार संसाधने व सुटे भाग यांची खरेदी आणि देखभालीच्या अनुषंगाने तांत्रिक सल्ला देणे.<br>३) या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार माहिती तंत्रज्ञान विषयक इतर कामे व मा.म यांनी वेळोवेळी सोपविलेली कामे. | |
| ३ | **पदाचे नाव** : सहायक माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (Assistant IT Officer)<br><br>**शैक्षणिक अर्हता** : बी.ई./आय.टी., बी.टेक./कम्प्युटर सायन्स, बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स/आय.टी.) अथवा सम कक्ष अर्हता<br><br>**कामाचा अनुभव :** शासकीय/ निमशासकीय / खाजगी कार्यालयामध्ये माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (IT Officer) किंवा सहायक माहिती व तंत्रज्ञान अधिकारी (Assistant IT Officer) किंवा प्रोग्रामर/आय.टी.किंवा मॅनेजर /आय.टी. किंवा तत्सम पदावर किमान ३ वर्षे काम केल्याचा अनुभव.<br>शासकीय कार्यालयातील कामाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील.<br><br>**परिश्रमिक : रु. ३८,६००/- + वाहतूक भत्ता(रु.४,०००/- पर्यंत)**<br><br>**<u>कामाचे स्वरुप :-</u>**<br>१) या कार्यालयातील आय.टी. ॲप्लीकेशन्सचे संपूर्ण नियंत्रण आणि अंमलबजावणी, हार्डवेअरच्या माध्यमातून माहितीचे संरक्षण, नेटवर्क आणि वापरकर्ता सुरक्षा तसेच सॉफ्टवेअर संबंधीत कामे, सी.सी.टी.व्ही. इत्यादी.<br>२) कार्यालयाच्या ई-प्रणालीबाबत सल्ला देणे, माहिती तंत्रज्ञानविषयक योजना/धोरण, आय.टी. संसाधने, नेटवर्किंग, आवश्यकतेनुसार संसाधने व सुटे भाग यांची खरेदी आणि देखभालीच्या अनुषंगाने तांत्रिक सल्ला देणे.<br>३) या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार माहिती तंत्रज्ञान विषयक इतर कामे. | २ |

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

| | |
|---|---|
| १. | उपरोक्त पदाकरिता निर्धारीत केलेली आवश्यक अर्हता, अनुभव धारण करतात अशा इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. |
| २. | उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. (याबाबत माध्यमिक शालांत परिक्षेचे (एस.एस.सी.) प्रमाणपत्र सादर करावे.) |
| ३. | करार पध्दतीने नियुक्ती झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. अटी व शर्ती मान्य आहेत, याबाबतचे तसेच सेवा समावेशनाचे अथवा सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ, हक्क किंवा अधिकार असणार नाहीत याबाबतचे बंधपत्र उमेदवाराने देणे बंधनकारक राहील. |

| | | |
|---|---|---|
| ४. | उपरोक्त संवर्गातील पदांकरीता नमुद केलेले वय (दिनांक ०१/०६/२०२५ रोजी ४५ वर्षांपेक्षा अधिक वय नसावे), शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे **दि. ०१ जून, २०२५** रोजीची वैध असतील. त्यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. | |
| ५. | पात्रता सुचीनुसार गुणवत्तानिहाय नामिकासूचीतील उमेदवारांना मुलाखतीसाठी ई-मेल अथवा पत्र पाठविण्यात येईल व निवड समितीने निवड केलेल्या पात्र उमेदवाराला नियुक्तीपत्र निर्गमित करण्यात येईल. उर्वरीत उमेदवारांबरोबर कोणताही संपर्क साधला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. | |
| ६. | निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सदर उमेदवारास निवड व नियुक्तीच्या प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल. | |
| ७. | अपूर्ण अर्ज रद्दबातल ठरविण्यात येईल. | |
| ८. | उपरोक्त कंत्राटी पदांचा सेवा कालावधी प्रथमतः ११ महिन्यांचा असेल मात्र या पुढील कालावधी त्यावेळची निकड, गरज तथा आवश्यकता पाहून संबंधीत अधिकाऱ्याची कार्यतत्परता आणि गुणवत्तेच्या आधारे सेवा कालावधीमध्ये अधिकतम तीन वर्षांपर्यंत, मात्र दरवर्षी नुतनीकरणाने सेवाखंडासह वाढ होऊ शकेल. | |
| ९. | उपरोक्त कंत्राटी पदांवर निवड होणाऱ्या उमेदवारांना त्या पदासाठी नियमानुसार एकत्रित मानधन अनुज्ञेय राहील. | |
| १०. | अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पुष्ठ्यर्थ उमेदवारांनी आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या स्वयं-साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक/अनिवार्य आहे. तसेच सर्व संबंधित मूळ प्रमाणपत्रे पडताळणी/ मुलाखतीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य आहे. | |
| ११. | उमेदवारांनी या जाहिरातीसोबतच्या विहित नमुन्यामध्येच स्वयं घोषणापत्र, चारित्र्य प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावेत. | |
| १२. | अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा अर्ज विहित मुदतीत या कार्यालयात पोहोचेल याची दक्षता व कटाक्षाने नोंद घ्यावी अन्यथा टपाल खात्याची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता ते आपोआपच रद्द ठरतील. | |
| १३. | निवड प्रक्रियेदरम्यान व तद्नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद, अवैध अथवा अयोग्य/ अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल. याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तसेच याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही. | |
| १४. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी. | |
| १५. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) कंत्राटी कालावधी सुरु होण्यापूर्वी जाहिर करणे आवश्यक राहील. | |
| १६. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांना कंत्राटी कालावधी दरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. सदर माहितीचा गैरवापर दृष्टोत्पत्तीस आल्यास संबंधित अधिकारी व्यक्तीशः जबाबदार राहील. या माहितीची गोपनियता बाळगणे तसेच या कार्यालयास कोणतीही हानी पोहचणार नाही, याची दक्षता, काळजी घेण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्याची असेल. | |
| १७. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील. | |
| १८ | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार असणार नाहीत. | |
| १९ | नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा करार पध्दतीवरील अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. | |
| २०. | सक्षम प्राधिकारी यांना कंत्राटी अधिकारी यांची संशयास्पद वर्तणूक, हालचाल निदर्शनास आल्यास त्यांचा कंत्राटी सेवा कालावधी कोणतीही पूर्व सूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल. | |
| २१. | सेवा समाप्तीनंतर संबंधित कंत्राटी अधिकारी यांनी त्यांच्या ताब्यात असलेली सर्व कागदपत्रे, दस्तऐवज, माहिती तसेच कार्यालयीन ओळखपत्र ताबडतोब संबंधित विभाग प्रमुखाकडे हस्तांतरीत करावेत. | |

| | |
|---|---|
| २२. | उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे. याबाबत निवड प्रक्रियेदरम्यान किंवा तद्नंतर सदर बाब निदर्शनास आल्यास उमेदवार तात्काळ अपात्र ठरेल. |
| २३. | उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला कंत्राटी सेवेतून कमी करण्यात येईल. |
| २४. | गुणवत्तेच्या आधारे तयार केलेली प्रतिक्षासूची आवश्यतेनुसार परंतु जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. तद्नंतर आपसूकच ती रद्द होईल. |
| २५. | निवड यादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक अनुभव व इतर अनुषंगिक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक मूळ प्रमाणपत्रे पडताळणीकरीता नियत दिनांकास सादर न केल्यास त्याचे नाव निवडयादीतून रद्द करण्यात येईल व नंतर याबाबत कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. |
| २६. | विहीत अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करूनच अर्ज भरावेत. |
| २७. | शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना व शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी या भरती प्रकियेला लागू राहतील. |
| २८. | उमेदवारांनी नियुक्तीपूर्वी खाली नमुद केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तपासणीसाठी या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.<br>• शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला / अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)<br>• माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.), उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (एच.एस.सी.) व पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षा यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूंची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. (Marksheet & Passing Certificate)<br>• विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) / नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र (Gazette) सादर करावे. |
| २९. | भरती प्रक्रिया अंशतः/ पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही. |
| ३०. | उमेदवार निवडीचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही |

**महत्वाच्या सूचना :-**

| | |
|---|---|
| १. | प्रमाणपत्र पडताळणी :-<br>• अर्जात भरलेल्या माहितीची पडताळणी प्रमाणपत्रांवरुन करण्यात येईल.<br>• नियत दिनांकास विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी याच टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यांची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची अर्जदाराने नोंद घ्यावी.<br>• मुलाखतीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे यांनी निश्चित केलेल्या ठिकाणी घेण्यात येतील. |
| २. | विहित कालावधीत आवश्यक बाबींची पूर्तता न केल्यास उमेदवार त्याचा / तीचा हक्क गमावेल. |

| | |
|---|---|
| ३. | उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह), भ्रमणध्वनीसह सुस्पष्ट, पूर्ण व वैध असावा. |
| ४. | निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवार कायद्यानुसार शिक्षेस पात्र ठरेल. |
| ५. | उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीस आणि मुलाखतीस हजर राहणेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| ६. | मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ठाणे यांनी कोणत्याही व्यक्तिला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचे अधिकार दिलेले नाहीत, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. |
| ७. | सविस्तर जाहीरात, अर्जाचा नमुना व इतर नमुने http://srammr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |

**विशेष सूचना :-**

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराने पाकिटावर डाव्या बाजूला ठळक अक्षरात पदाचे नांव नमूद करावे. |
| २. | अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करुन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यामध्ये अर्ज सादर करावेत. अन्यथा अर्ज बाद ठरविण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. अर्जासह सध्याचा पासपोर्ट साईज फोटो, पत्र व्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) व दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक, शैक्षणिक पात्रता व अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या प्रतींसह शासकीय अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारिस रस्ता, मानपाडा, ठाणे (प.) -४००३१० यांच्याकडे **दिनांक १७ जून, २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** अर्ज सादर करावेत. |
| ३. | विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. |

**दिनांक : १० जून, २०२५**
**स्थळ : ठाणे.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे**

# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

पासपोर्ट साईज रंगीत फोटो चिकटवून स्वाक्षरी करणे.

प्रति,
प्रशासकीय अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
महानगरपालिका मंडई इमारत,
खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारिस रस्ता,
मानपाडा, ठाणे (प.) -४००३१०

१. #अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ____________________

२. #अर्जाचा प्रकार :- **कंत्राटी (शासकीय/ निमशासकीय/शासन अंगीकृत उपक्रमांमधील अनुभव) / कंत्राटी (खाजगी क्षेत्रातील अनुभव)**

३. उमेदवाराचे पूर्ण नांव :- ____________________
(आडनाव) (नाव) (मधले नाव)
(उमेदवाराचे पहिले नांव (केवळ विवाहित महिलांच्या बाबतीत)

४. जन्मतारीख :- __________ वय (दि.<u>०१.०६.२०२५</u> रोजी) वर्षे __________ महिने __________

५. लिंग :- __________ नागरीकत्व :- __________ धर्म :- __________

६. जात* :- __________ (SC/ST/OBC/VJNT/__________) *अनिवार्य नाही.

७. कायमचा पत्ता :- ____________________
____________________

८. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ____________________
____________________

९. ई-मेल आयडी :- ____________________

१०. भ्रमणध्वनी क्रमांक :- __________ पर्यायी संपर्क क्रमांक :- __________

११. ज्ञात असलेल्या भाषा :- ____________________

१२. धारण केलेली शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता दिनांक ०१.०६.२०२५ पर्यंत (अर्हता धारण केलेल्या दिनांकानुसार) :-

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विषय | ऊत्तीर्ण वर्ष | टक्के | मंडळ / विद्यापीठ / संस्था |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

१३. दिनांक ०१.०६.२०२५ रोजीपर्यंत संपादित केलेला अनुभव :-

| अ.क्र. | संस्था/कंपनीचे नाव | कालावधी | | | धारण केलेले पद | केलेल्या कामाचे स्वरुप | पदानुरुप अनुभव (वर्षामध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | एकूण | | | |
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |
| ४. | | | | | | | |
| ५. | | | | | | | |
| | | | | | | एकूण | |

१४. अधिवास प्रमाणपत्र क्र. :- ____________________ आधार कार्ड क्र. :- ____________________

१५. मतदार ओळखपत्र क्र. :- ____________________ पॅन कार्ड क्र. :- ____________________

१६. उमेदवाराचे स्वभाववृत्ती, प्रामाणिकपणा, ओळख आणि निवासी पत्त्याबद्दल प्रमाणित करणारे चारित्र्य प्रमाणपत्र वर्ग-१ / वर्ग-२ राजपत्रित अधिकारी/विकाअ यांचेकडून त्यांच्या लेटरहेडवर मूळ स्वरुपात. (लागू असल्यास) :- ____________________

१७. वर्तमान आस्थापनेचे नाव, पत्ता, ईमेल आयडी, फोन नंबर. प्रमुख व्यक्ती (असल्यास). :- ____________________

# माहितीच्या सत्यतेकरिता स्वयंसाक्षांकित सहपत्र.

("लागू नसल्यास खोडून टाकणे)

१. वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला) :- होय / नाही
२. शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता (उत्तीर्ण प्रमाणपत्र अनिवार्य) :- होय / नाही (संख्या ________ )
३. अनुभव प्रमाणपत्रे :- होय / नाही (संख्या ________ )
४. स्वयंस्वाक्षांकित स्वयंघोषणापत्र :- होय / नाही
५. अधिवास प्रमाणपत्र :- होय / नाही
६. सक्षम प्राधिकरणाचे चारित्र्य प्रमाणपत्र (लागू असल्यास) :- होय / नाही
७. ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड / मतदार ओळखपत्र / पॅन कार्ड छायांकित प्रत. :- होय / नाही

**जाहिरनामा :-**

मी याद्वारे घोषित करतो /करते की, माझ्याद्वारे अर्जामध्ये सादर केलेली सर्व विधाने आणि तथ्ये सत्य आहेत आणि माझ्या माहितीनुसार आणि समजूतीनुसार बरोबर आहेत, कोणतीही बाब लपविलेली किंवा दडविलेली नाही. त्याकरिता मी सर्व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे जोडली आहेत. मला हे देखील ज्ञात आहे आणि याचीदेखील जाणीव आहे की, भरती, नियुक्ती आणि त्यानंतरच्या कोणत्याही टप्प्यात माझे कोणतेही विधान असत्य आढळल्यास, मी अर्ज केलेल्या पदासाठी मला अपात्र ठरविले जाईल आणि कायद्यानुसार लागू असलेल्या कोणत्याही दंडात्मक कारवाईसाठी मी पात्र ठरेन.

मी प्रसिध्द केलेली जाहिरात आणि संबंधित शासन निर्णय (लागू असल्यास) वाचले आहेत आणि त्यात नमूद केलेल्या सर्व अटी आणि शर्तींबद्दल मी स्वतःला जागरूक केले आहे आणि त्यांचे तंतोतंत पालन करण्याचे प्रतिज्ञा करतो/ हमी देतो. मी प्रमाणित करतो की, आजपर्यंत माझ्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित/प्रस्तावित नाही (केवळ सेवानिवृत्त उमेदवारांसाठी लागू). तसेच मी पुढे पुष्टी करतो की, माझ्या माहितीनुसार आजमितीस माझ्या विरुद्ध कोणतीही देय रक्कम, कोणत्याही स्वरूपाची कोणतीही कायदेशीर कार्यवाही प्रलंबित नाही.

करार पद्धतीने माझी नियुक्ती झाल्यास, सेवा समावेशानसाठी अथवा सामावून घेण्यासाठी अथवा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ, हक्क किंवा अधिकार यांवर मी दावा करणार नाही, याची मी हमी देत आहे.

दिनांक :

ठिकाण :

उमेदवाराचे नाव व दिनांकासहित सही

दोन सक्षम व्यक्तींचे संदर्भ (केवळ खाजगी क्षेत्रातील अनुभव असलेल्या उमेदवारांसाठी लागू).

१) नांव :- ______________________________

पदनाम :- ______________________________

कंपनी/ संस्थेचे नांव :- ______________________________

संपर्क क्रमांक :- ______________________________

ई-मेल आयडी :- ______________________________

२) नांव :- ______________________________

पदनाम :- ______________________________

कंपनी/ संस्थेचे नांव :- ______________________________

संपर्क क्रमांक :- ______________________________

ई-मेल आयडी :- ______________________________

# चारित्र्य प्रमाणपत्राचा नमुना

कृपया पासपोर्ट
साईज फोटो
चिकटवा. (फोटोच्या
बाजूने पारित
करणाऱ्या सक्षम
प्राधिकाऱ्यांचा शिक्का)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीम./ कु. ______________________________

यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी ____________________________________

राहणार________________________________________जिल्हा____________

तालुका ______________ पिन कोड ____________ राज्य ____________

हे/हया मागील ________ वर्षांपासून माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत.

ते/त्या चांगली नैतिकता बाळगतात आणि त्यांची प्रामाणिकता खात्रीशीर आहे. म्हणून, मी त्यांची/तिची मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे कार्यालयात नोकरीकरिता योग्य असल्याची शिफारस करतो. ते/त्या माझ्याशी संबंधित नाहीत.

ठिकाण :

दिनांक :

राजपत्रित अधिकारी वर्ग-१/वर्ग-२/
विशेष कार्य अधिकारी यांचे नाव व पत्ता
(शिक्क्यासह सही, पत्ता)

# स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

पासपोर्ट साईज
फोटो
चिकटवा

मी...________________________ श्री.____________________

____________ यांचा मुलगा / मुलगी वय________ वर्षे, आधार क्रमांक (असल्यास)

____________ व्यवसाय ____________ राहणार____________

____________ याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोट्या आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ____________ अर्जदाराची सही ____________

दिनांक : ____________ अर्जदाराचे नांव ____________

## मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)

क्र. झोपुप्रा/प्रशासन/२५१/२०२५ दिनांक :- ११/०६/२०२५

# शुद्धीपत्रक

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयात मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी व सहायक माहिती व तंत्रज्ञान अधिकारी ही पदे ११ महिन्यांसाठी कंत्राटी तत्वावर भरणेबाबत दि. ११/०६/२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर जाहिरातीमधील तक्यातील अ.क्र. २ व ३ समोर स्तंभ क्र. ३ मध्ये पदांची संख्या या अंतर्गत ०२ पदे ऐवजी ०१ पद असे वाचावे.

-सही-
पराग सोमण (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मुंबई महानगर प्रदेश
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम)-४०० ६१०.
दुरध्वनी क्र.०२२-४१३५६८४०, E-mail ID- adminoffmmr@sra.gov.in